महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:- १४४२/सकअमविप/२०२२/२४ दिनांक :- ०१ फेब्रुवारी,२०२३

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

## सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा- २०२२
## अंतिम निकाल
## जाहिरात क्रमांक - ०८६/२०२२

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक १० डिसेंबर, २०२२ रोजी मुंबई केंद्रावर घेण्यात आलेल्या **सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा- २०२२** मधील एकूण **६९** पदांचा (मंत्रालयीन विभाग-६२ व महाराष्ट्र लोकसेवा आयोगचे कार्यालय -७) अंतिम निकाल दिनांक ०१ फेब्रुवारी,२०२३ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

**२.** सदर परीक्षेमध्ये मंत्रालयीन विभागातून **श्री.शिवकुमार चंद्रकांत माशाळकर (बैठक क्रमांक-MB001044)** हे व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातून **श्री.अविनाश पंढरीनाथ बडधे (बैठक क्रमांक -MB002014)** हे **प्रथम** आले आहेत.

**३.** उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व सीमांकन गुण आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

**४.** प्रस्तुत निकालाधारे शिफारसपात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांच्या शिफारशी विषयांकित परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्यांच्या पृष्ठर्थ नियुक्तीच्यावेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रांवरून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहे. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता नियुक्तीच्यावेळी न केल्यास, शासनस्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना व अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**५.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणामध्ये दाखल करण्यात आलेल्या विविध न्यायिक प्रकरणांमधील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

**६.** प्रस्तुत अंतिम निकालातील ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मधील सूचना क्रमांक ६.४.४ पहावी.)

ठिकाण :- मुंबई

उप सचिव (परीक्षोत्तर) (अ. प.)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग